हॅलो प्रभात
अहिल्यानगर
जिल्हा विशेष ■ शनिवार, १५ नोव्हेंबर २०२५

पावसाळ्यात छत्र्या उगवल्यागत काही जण निवडणुकीत उगवतात : ना.अजित पवार

बारामती : किरण बोराडे

पावसाळ्यात जशा छत्र्या उगवतात तसं काही जण निवडणुकीत उगवतात, निवडणूक झाल्यावरती बाहेर दिसतात का ? कधी तुमच्या सुख दुःखात आली का? याचा विचार करा.ही निवडणूक केवळ मतांची लढाई नाही ही दोन्ही शहराच्या विकासाची चाचणी आहे.राज्यात २८८ ठिकाणी नगराध्यक्ष थेट निवडला जाणार आहे,रुसवे फ ुगवे गट तट बाजूला ठेवा. मी जो नगराध्यक्ष तो आपल्याला निवडून आणायचा आहे. असा आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीकरांना केल आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बारामती मध्ये बारामती नगरपरिषद आणि माळेगाव नगरपंचायत निवडणुकीकरिता इच्छुक असणाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या यानंतर कार्यकर्ता मेळाव्याला अजित पवार संबोधन करत होते.

अजित पवार म्हणाले की,आपण जेव्हा एक दिलाने निवडणुकीला उभा राहतो तेव्हा आपल्याला कोणतीही ताकद हरवू शकत नाही, कोण माईचा लाल हरवू शकत नाही.आपल्यात जर कुठे गडबड झाली तर अडचण येते.आता निवडणुकीच्या निमित्ताने अनेकजण बोलणारे येथील पण काम करणारा फक्त अजितदादा असतो.मी काम करतोय माझं काम बोलतोय, काही लोक चुकीच्या गोष्टी करायला लागली की मी विचार करतो एवढं काम दुसरा कुठल्या तालुक्यात केलं असतं तर डोक्यांवर उचलून घेतलं असतं.माझ्यावर

टाकलेला विश्वास कधीही खोटा ठरवू शकणार नाही. अशा प्रकारचा शब्द या मेळाव्याच्या निमित्ताने देतो. विकासासाठी आपण कटिबद्ध आहोत याची ग्वाही देतो.

घड्याळ बघायचं आणि बटन दाबायचं

एक नाही आणि अर्ध नाही किंवा पाव देखील नाही, घड्याळ बघायचं आणि बटन दाबायचं.तुम्ही जेवढे मला बारामतीला निवडून द्याल तेवढी माझी जिल्ह्यात मान वाढणार आहे.माळेगाव ला सुद्धा एक रोल मॉडेल नगरपंचायत कशी असू शकते अशा पद्धतीने माळेगाव नगरपंचायतीचा चेहरा मोहरा राज्यात बदलायचा आहे. आता काही झाले तरी म ाळेगावकरांच्या कार्यकर्त्यांच्या नागरिकांच्या मदतीने आपण माळेगावला उद्याच्या पाच वर्षात रोल मॉडेल नगरपंचायत बनवायचं आहे.आपली एवढी धमक आहे आपण जे बोलतो ते करतो. आपल्या मनगटांमध्ये ती ताकद आहे करायची, मी त्या उद्योगपतींना सांगू शकतो आता देखील मी सीएसआरचा निधी आणला आहे.कोणतेही काम करताना इच्छाशक्ती फार महत्त्वाचे असते.आपल्याला राजकारण बाजूला ठेवून एकत्र राहायचं आहे विकासाचा राजकारण करायचे आहे. कामे चांगली केली तर लोकांचे मत परिवर्तन होतं.राज्य सरकारच्या केंद्र सरकारच्या चांगल्या योजना येत आहेत.पंतप्रधान असतील नितीन गडकरी असतील अमित शहा असतील यांना भेटेल, शहराच्या विकासासाठी विविध प्रकारचा निधी आणेल.

मला निवडून द्यायला पवार साहेबच कारणीभूत

आता लोकसभेला असं झालं तसं झालं हे सांगत बसू नका, शेवटी हे सगळे आपलेच मतदार आहेत.एका बाजूला पवार साहेब एका बाजूला मी होतो बारामतीकरांच्या पुढे प्रश्न राहणारच ना. का काहींचं प्रेम साहेबांवर नसावं ? असलं पाहिजे माझही प्रेम आहेच ना ! पण मी काही राजकीय भूमिका घेतली त्यामुळे इतकं बारीक बघणं फार चुकीच आहे. अरे जरा दिलदार पणा वाढवा ना ! मोठेपणा वाढवा ना ! मनाचा मोठेपणा करा. आपण कालपर्यंत एकत्र होतो ना ? मला सुरुवातीला निवडून द्यायला पवार साहेबच कारणीभूत आहेत ना ? मी काय वरून टपकलो व्हय... हे कसं आपल्याला विसरता येईल.भाषण दरम्यान अजित पवारांना एक चिठ्ठी आली. त्यात बारामती तालुक्याच्या बाहेरील गुंड लोक जे बारामती एमआयडीसी मधील आहेत त्यांची गुन्हेगारी वाढत चालली आहे असं लिहिलं होतं.

त्यावर अजित पवार म्हणाले मी या संदर्भात माझ्या पोलीस अधिकाऱ्यांना सांगतो हे अजिबात चालणार नाही.

तुम्ही फार संकुचित विचाराचे राहू नका. बारामतीकरांनी माळेगाव कारखान्याला आमदारकीला साथ दिली. बदल झाला ना. मला खासदारकीला ४८ हजार मतं कमी पडली मग मी म्हटलो का मला आता मत दिलं नाही मी आता याचं बघतोच मग एक लाख मत कशी झाली असती. मित्रांनो तसं नसतं काही काही माणसं जोडायची असतात. काहींचं थोडं चुकलं असेल तर त्यांना मुख्य प्रवाहात आणू.झालं गेलं गंगेला मिळालं, आपल्याला खूप पुढे जायचं आहे फार काही त्या गोष्टीचा विचार करू नका.एकदा चित्र स्पष्ट झालं की प्रचाराचा नारळ फोडेल,

काही सांगायचे ते माळेगावकर आणि बाराम तीकरांना सांगेन.त्यानंतर हेवे दावे गट तट, काहीजण एवढं उथ मातपणे बोलत आहेत, घमंड करत आहेत. त्यांचं त्यांना लखलाभ.असं म्हणत बारामती नगराध्यक्ष धरून सर्व नगरसेवक निवडून येतील हे आपण बघु अस आवाहन यावेळी अजित पवारांनी केले.

वैद्यकीय प्रतिनिधींच्या कायदेशीर हक्कांसाठी रॅलींचे आयोजन

सांगली : हॅलो प्रभात

देशाच्या औषध उद्योगात वैद्यकीय प्रतिनिधी हे एक महत्त्वपूर्ण दुवा म्हणून कार्यरत आहेत. आरोग्यसेवा व्यावसायिकांना औषधांची अचूक माहिती पोहोचवून आणि रुग्णांना आवश्यक औषधे उपलब्ध ठेवण्यात ते अत्यंत जबाबदारीने भूमिका बजावतात.मात्र, गेल्या काही वर्षांत या कर्मचाऱ्यांवर वाढता कामाचा ताण, असुरक्षित रोजगार, अवास्तव विक्री दडपण आणि कायदेशीर संरक्षणाचा अभाव या समस्या तीव्र झाल्या आहेत.या पार्श्वभूमीवर ऋ्वठख च्या नेतृत्वाखाली देशभरातील सर्व वैद्यकीय प्रतिनिधी आपल्या कायदेशीर हक्कांच्या आणि अस्तित्वाच्या संरक्षणासाठी व्यापक लढा उभारत आहेत.या आंदोलनाच्या चार प्रमुख मागण्यांसाठी १७ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबईत आणि १८ नोव्हेंबर २०२५ रोजी नवी दिल्लीमध्ये भव्य राष्ट्रीय रॅलींचे आयोजन करण्यात आले आहे. ऑगस्ट २०२५ पासूनच देशभरात तयारीचा धडाका सुरू असून, राज्य व जिल्हास्तरावर सभा, मोर्चे आणि जनजागृती मोहिमा राबवण्यात येत आहेत. हजारो वैद्यकीय प्रतिनिधी या दोन्ही रॅलींमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होणार आहेत. हे आंदोलन वैद्यकीय प्रतिनिधींच्या सुरक्षिततेसाठी, स्थिर रोजगारासाठी आणि औषध उद्योगातील कामगार हक्कांच्या संरक्षणासाठीचा एकजुटीचा राष्ट्रीय लढा आहे. देशभरातील सर्व वैद्यकीय प्रतिनिधींना या ऐतिहासिक चळवळीत सक्रियपणे सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कॅनरा बँक ऑफिसर्स असोसिएशनसाठी नवे नेतृत्व

पुणे : हॅलो प्रभात

कॅनरा बँक ऑफिसर्स असोसिएशनची (कॅनरा बँक ऑफिसर असोसिएशन) २० वी त्रैवार्षिक परिषद ८ ते १० नोव्हेंबरदरम्यान विशाखापट्टणम येथे पार पडली. कॅनरा बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी के. सत्यनारायण राजू हे प्रमुख पाहुणे होते.तीन दिवसीय बैठकीत नवीन पदाधिकाऱ्यांची निवड झाली: के. रवीकुमार यांची सरचिटणीस म्हणून, राजीव निगम यांची अध्यक्ष म्हणून, जेकब पी.सी. यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली. पुणे येथिल सचिन वायकर आयोजन सरचिटणीस ,प्रिया घोरपडे ऊप सरचिटणीस, सुधिर जाधव प्रादेशिक सचिव पुणे २ ,दिनेश फुलझलके प्रादेशिक सचिव पुणे१ यांची निवड करण्यात आली.

शिर्के प्रकरणाच्या न्यायालयीन सुनावणीकडे कृषिशास्त्रज्ञांचे लक्ष

राहुरी : हॅलो प्रभात

महात्मा फुले कृषी विद्यापीठातील संशोधन संचालक डॉ. विठ्ठल साहेबराव शिर्के यांच्या कथित बनावट दाखल्यांच्या विरोधात न्यायालयात दाखल झालेल्या दाव्याकडे आता कृषिशास्त्रज्ञांचे लक्ष लागून आहे.शेतकरी अशोक एकनाथ तनपुरे यांनी डॉ. शिर्के यांच्या विरोधात भारतीय न्याय संहितेच्या ३१८(४), ३२४(१,२), ३३६ (२,३) व ३३८ (५) प्रमाणे दावा दाखल केला आहे.

राहुरी येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर सोम वारी (ता. १७) या दाव्याची सुनावणी होणार आहे. 'डॉ. शिर्के यांचे मूळ नाव नामदेव साहेबराव डुकरे आहे. त्यांजा जन्म २ जून १९६२ रोजी रा. मौजे डुकरेवाडी (रावगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर) येथे झाला. राज्य शासनाने २०२४ मधील निर्णयानुसार, निवृत्तीचे वय ६० वर्षे केले आहे. तर डॉ. शिर्के यांचे वय ६२ वर्षांच्या पुढे आहे,' असे दाव्यात नमूद केले आहे.डॉ. शिर्के हे ३० जून २०२४ रोजीच निवृत्त होणे आवश्यक होते. परंतु त्यांनी 'नामदेव डुकरे' ऐवजी स्वतः चे नाव 'विठ्ठल शिर्के' असे बदलून घेतले. मात्र त्यांच्या जिल्हा परिषद शाळा शेगूड व कर्जत येथील महात्मा गांधी विद्यालयातील दाखल्यांवर मूळ नाव असून तेथे जन्मतारीख

माझा लढा चालूच राहील

न्यायालयात डॉ. शिर्के यांनी भूमिका मांडलेली नाही. ते गैरहजर राहतात. त्यांना विद्यापीठातील लॉबी पाठीशी घालते आहे. त्यांच्यावर कारवाई होण्यासाठी माझा लढा चालूच राहील, असे शेतकरी श्री.तनपुरे यांनी सांगितले.

पवारांच्या राष्ट्रवादीचा घात करणारी पिपाणी 'हद्दपार'

दौंड : हॅलो प्रभात

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बंड केल्यानंतर राष्ट्रवादीची दोन शकले झाली. यामध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीला घड्याळ चिन्ह मिळालं, तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीला तुतारी वाजवणारा माणूस मिळाला.

मात्र, अपक्षांना मि ळालेल्या पिपाणी या साध्यम असणाऱ्या चिन्हामुळे मोठा फटका राष्ट्रवादीला बसला. शरद पवारांच्या राष्ट्रवादीला दोन निवडणुकीत दणका बसल्यानंतर आता निवडणूक आयोगाकडून हे चिन्ह रद्दबातल करण्यात आलं आहे. निवडणूक आयोगाने घेतलेल्या निर्णयावर राष्ट्रवादी



काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आनंद व्यक्त करतानाच निवडणूक आयोगाला खोचक टोला लगावला आहे. त्यांनी ट्विट करत प्रतिक्रिया देत तुतारी चिन्ह कायमचं हद्दपार केल्याबद्दल निवडणूक आयोगाचे आभार मानताना खडे बोल सुद्धा सुनावले आहेत. शशिकांत शिंदे यांनी ट्विट करत म्हटलं आहे की लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत या चिन्हामुळे कार्यकर्त्यांना आणि मतदारांना मोठा गोंधळ निर्माण झाला, त्याची राजकीय किंमत पक्षाला चुकवावी लागली होती. हा निर्णय जर आधीच घेतला गेला असता, तर आज महाराष्ट्रातील आणि देशातील राजकीय चित्र नक्कीच वेगळ असतं.

शेवटी उशिरा सुचलेलं शहाणपण अस याला म्हणावं लागेल.

निवडणूक चिन्हातून पिपाणी (ट्रम्पेट) हे चिन्ह कायमचं वगळल्याबद्दल निवडणूक आयोगाचे आभार! हा निर्णय लोकशाही आणि स्वच्छ निवडणूक प्रक्रियेसाठी एक सकारात्मक पाऊल आहे, असं त्यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटलं आहे.

आ.सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त नेत्रशिबिर

मोडनिंब : संतोष पांढरे

बोरामणी, मुस्ती आणि तांदुळवाडी येथे आ.सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर ग्रामीण नागरिकांसाठी खऱ्या अर्थाने आनंदाची आणि जीवनदायी संधी ठरली. महिला, शेतकरी बांधव व ज्येष्ठ नागरिकांनी शिबिरात रांगा लावल्या. अनेक जणांनी आपल्या दृष्टीसंबंधी समस्या लांबणीवर टाकल्या होत्या, पण आता विशेषज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली बोरामणी, मुस्ती, तांदुळवाडीतील नागरिकांना मिळाली मोफत तपासणी, चष्मा आणि म ोतीबिंदू शस्त्रक्रिया. शिबिरात ६०० नागरिकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १५० जणांना मोतीबिंदूचे निदान झाले, तर ३६५ जणांना मोफत चष्मे दिल्या गेल्या. मोतीबिंदू रुग्णांना शंकरशेठ साबळे हॉस्पिटल, सोलापूर येथे मोफत शस्त्रक्रिया करून दिल्या गेल्या. अनेक ज्येष्ठ नागरिक आता दृष्टी स्पष्ट झाल्याने जीवनात नवा उत्साह अनुभवणार आहेत. सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष नेताजीभाऊ खंडागळे म्हणाले,ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाला शहरातील दर्जेदार आरोग्यसेवा मिळणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. अनेकांनी आर्थिक कारणास्तव तपासणी किंवा उपचार थांबवलेले होते; अशा उपक्रम ांमुळे त्यांच्यापर्यंत जीवनदायी सेवा पोहोचते. वैद्यकीय अधिकारी, स्वयंसेवक, ग्रामपंचायत सदस्य आणि सह्याद्री फाउंडेशनचे कार्यकर्ते दिवस-रात्र मेहनत घेऊन शिबिर यशस्वी केले.

शिवसेनेतर्फे डॉ.विनय पत्की यांनी केला अर्ज दाखल

आटपाडी : हॅलो प्रभात

आटपाडी नगरपंचायतीच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेतर्फे प्रभाग १२ मधून डॉ.विनय जयराम पत्की यांनी अर्ज दाखल केला.वैद्यकीय सेवेतील प्रसिद्ध व्यक्तीमत्व हे आता नगरपंचायत द्वारे जनसेवेत आपले योगदानआजमावणार आहे. गेले दोन-तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी आटपाडी सह अन्य ठिकाणी आपल्या रूग्णसेवेच्या माध्यमातून आपला ठसा उमटविला आहे.वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी सुविधा आयसीयू,श्रीसेवा आयसीयू,नर्सिग कॉलेज यांद्वारे आटपाडी पंचक्रोशीतील जनतेला वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आटपाडी तालुक्याला वैद्यकीय क्षेत्रातील सेवेचा फायदा झाला. वैद्यकीय सेवेच्या माध्यमातून त्यांनी जनमानसांचा विश्वास सार्थ ठरविला आहे. आटपाडी शहर विकासा च्या संकल्पने ला अनुसरून त्या पूर्णत्वास नेण्यासाठी उच्चशिक्षित व रूग्णप्रिय,लोकाभिमुख असलेले डॉ.विनय पत्की यांचा आग्रह परिसरातील जनतेने केल्यानेच शिवसेना नेते तानाजी पाटील यांनी त्यांना उमेदवारी दिली. जनतेच्या पाठिंब्यावर आपण भरीव योगदान देऊ असा विश्वास डॉ.पत्कीनी व्यक्त केला.समाजीक क्षेत्रात आपले वेगळेपण निर्माण करून विजयी पताका फडकवतील असा विश्वास परिसरातील नागरिकांना आहे.

राजेरामराव मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू जयंती साजरी

जत : हॅलो प्रभात

राजे रामराव महाविद्यालयात देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. लक्ष्मण भरगंडे यांनी आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनात पंडित नेहरूंच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. त्यांनी शिक्षण, विज्ञान, लोकशाही आणि बालकल्याण या क्षेत्रातील नेहरूंच्या योगदानाचा उल्लेख करताना सांगितले की,नेहरूंचा मानवतावादी दृष्टिकोन आणि मुलांप्रती असलेले प्रेम आजही भारतीय शिक्षणव्यवस्थेचे प्रेरणास्थान आहे. विद्यार्थ्यांनी नवकल्पना, जिज्ञासा आणि ज्ञानप्रेम जोपासले, तरच खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्मिती शक्य आहे.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. महादेव करेनवर होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.सतीशकुमार पडोळकर यांनी पंडित नेहरूंच्या विचारांची उजळणी करत कार्यक्रमाचा हेतू स्पष्ट केला.कार्यक्रमाची सांगता प्रा. रोहिणी शिंदे यांनी आभारप्रदर्शन करून केली.

युवासेना राहुरी तालुका अध्यक्षपदी सचिन करपे

राहुरी : हॅलो प्रभात

युवासेना राहुरी तालुका प्रमुखपदी सचिन करपे यांची निवड करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत करपे यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले. करपे हे युवकांमध्ये लोकप्रिय व कार्यतत्पर नेतृत्व म्हणून ओळखले जातात. सामाजिक, शैक्षणिक व युवकांच्या प्रश्नांवर सातत्यपूर्ण काम करत असल्यामुळे संघटन मजबूत करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. निवडीनंतर करपे यांनी पक्षाने दाखवलेल्या विश्वासाचे मोल राखत प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी माजी खासदार सदाशिव लोखंडे, युवा नेतृत्व राजू शेटे, युवासेना उत्तर जिल्हा अध्यक्ष अभिषक भोसले.शुभम वाघ, शेतकरी सेना प्रदेशाध्यक्ष रविभाऊ मोरे, शिवसेना युवा उपजिल्हा प्रमुख सुभाष जुंदरे, शिवसेना तालुका प्रमुख देवेंद्र लांबे उपस्थित होते.

'व्हॉलीबॉल'स्पर्धेस क्रीडा रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

ईश्वरपूर : हॅलो प्रभात

लोकनेते राजारामबापू पाटील वरिष्ठ गट पुरुष व महिला राज्य अजिंक्य पद व्हॉलीबॉल स्पर्धेच्या पहिल्या दिवसाच्या खेळात पुरुषांच्या मुंबई उपनगर,पुणे,अमरावती व वर्धा या संघांनी,तर महिलांच्या पुणे,कोल्हापूर आणि नाशिक संघांनी प्रतिस्पर्धी संघांच्यावर मात करीत पुढे वाटचाल केली. सांगली जिल्ह्या च्या पुरुष व महिला संघांनी अनुक्रमे रायगड व बीड या संघांना सहज पराभूत करून विजयी सलामी दिली. महाराष्ट्र राज्य व्हॉली बॉल असोसिएशनचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सांगली जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनने उरूण ईश्वरपूर (ता.वाळवा) येथे चार दिवसाच्या या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेस क्रीडा रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पुरुषांच्या परभणी जिल्हा विरुद्ध अकोला जिल्हा संघातील सामना चुरशीचा झाला. परभणीने पहिला सेट २५-२१ ने जिंकला,तर अकोलाने २५-१८ ने दुसरा सेट जिंकत सडेतोड उत्तर दिले. मात्र परभणीने १५-१२ ने तिसरा सेट जिंकत अकोलावर मात केली. सांगली

जिल्हा संघाने रायगड संघास २५-४,२५-१५ गुणांनी,तर वर्धा संघाने अहिल्यानगर संघास २५-६,२५-६ गुणांनी सरळ मात दिली. पुणे संघाने लातूर संघास २५-११,२५-२४ गुणांनी,अमरावती संघाने सातारा संघास २५-११,२५-२०गुणांनी,मुंबई उपनगर संघाने नाशिक संघास २५-४,२५-१० गुणांनी, कोल्हापूर संघाने नांदेड संघास २५-१७, २५-१९ गुणांनी,अहिल्यानगर संघाने वाशीम संघास २५-९,२५-१० गुणांनी,छत्रपती संभाजीनगर संघाने २५-२२,२५-१४ गुणांनी, चंद्रपूर संघाने हिंगोली संघास २५-१३,२५-१४ गुणांनी पराभूत केले. महिलांच्या गोंदिया विरुद्ध जळगाव,तसेच नाशिक विरुद्ध बीड या संघातील सामने चांगलेच रंगतदार झाले. गोंदिया व नाशिक संघानी दोन सेट जिंकत विजय प्राप्त केला. सांगली संघाने २५-६,२५-१० गुणांनी बीड संघावर सहज विजय मिळविला. पुणे संघाने अहिल्यानगर संघावर २५-१३, २५-८ गुणांनी, मुंबई शहर संघाने लातूर संघावर २५-१९, २५-१७ गुणांनी,कोल्हापूर संघाने मुंबई उपनगर संघावर २५-१३, २५-२० गुणांनी, वर्धा संघाने अहिल्यानगर संघावर २५-१८, २५-२० गुणांनी,मुंबई शहर संघाने धाराशिव संघावर २५-१६,२५-६ गुणांनी,बीड संघाने गोंदिया संघावर २५-१३,२५-१२ गुणांनी मात केली. पुरुषांचे ८ गट,तर महिलांचे ४ गट असून पहिल्या फेरीत साखळी पध्दतीने सामने खेळविले जात आहेत. आज (शनिवारी) उप उपांत्य आणि उपांत्य सामने पाहण्याची संधी क्रीडा प्रेमींना मिळणार आहे. राष्ट्रीय पंच दीपक चव्हाण,शंभूराजे संकपाळ,सुरेंद्र गांडूळे, गिरीश निमसे,दिव्या शम ार्ा यांनी पंच म्हणून जबाबदारी पाहिली